# निशाणी क्र. १२३ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ याने सदरचा अर्ज त्याचेविरूध्द् झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे म्हणण्यानुसार, प्रस्तूत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ तर्फे कैफियत दयावयाची आहे. तथापी सदर प्रतिवादी क्र. १ यास आपली कैफियत दयावयास उशीर झाल्यामुळे त्याचे विरूध्द विना कैफियत असा आदेश दि. २१/१२/२०१६ रोजी झाला आहे. मात्र या उशीरासाठी प्रतिवादी क्र. १ यांनी मुद्दामहून जाणीवपूर्वक उशीर केलेला नाही. सदर प्रतिवादी क्र. १ यास दि. २/८/२०१६ रोजी दाव्याचे समन्स व नि. क्र. ५ ची नोटीस मिळाली. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ हे स्वत: हजर झाले, बजावणीचा पत्ता दिला व कैफियत दयावयास मुदत घेतली. तेव्हा सदर प्रतिवादी क्र. १ यांना कायद्याचे तरतुदीची व्यवस्थितपणे माहिती नव्हती. त्यांनी सदर कालावधीत आपले योग्य ते कागदपत्रे मिळविण्याचे प्रयत्न केले, मात्र त्यांना वेळेवर कागदपत्र उपलब्ध होवून शकले नाहीत. त्यानंतर त्यांना दिवाणी प्रक्रिये बद्दल ब—याच गुंतागुंती असतात, तेव्हा ते योग्य ते वकील नेमावेत असे ठरवून त्यांनी दि. ७/६/२०१७ रोजी आपले तर्फे कामकाज पाहण्यासाठी वकीलांची नेमणूक केली. त्यानंतर वकिलांना माहिती दिली त्यांनी अधिक कागदपत्रे मिळवायला लागतील असे सुचविले. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांनी कागद मिळविणेचे प्रयत्न केले व त्यामुळे ही कैफियत देणेस उशीर झाला आहे. सबब वरील कारणास्तव कैफियत देणेस झालेला विलंब माफ करणेत येवून प्रतिवादी क्र. १ विरूध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून त्याची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर नि. क्र. १२६ ला म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, हा अर्ज खोटा व खोडसाळ असून सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी ब—याच विलंबाने दिलेला आहे. सदर अर्जातील नमूद मजकूरात विलंबाचे योग्य कारण दिलेले नाही. सदर कामी दिलेले विलंबाचे कारण देखील खोटे व खोडसाळ असून पटण्याजोगे नाही. इतक्या विलंबाने प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज चालण्याजोगा नाही. सबब अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा वाटप, पृथक कब्जा व निरंतर मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यास याच न्यायालयात त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यास न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. शिवाय प्रस्तूत प्रतिवादीस कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मूळीच वाटत नाही. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रस्तूत प्रतिवादीने वादीला खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे:

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ याने रूपये ५००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्याने रूपये २५०/— वादीस दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. प्रस्तुत प्रतिवादीने वरील पूर्तता केल्यानंतर त्याच्याविरूध्द् झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून कैफियत स्विकारणेत येते.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: २७/०३/२०१९